MHBU130028172022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १२.१०.२०२२ | | |
| नोंद तारीख | : | १२.१०.२०२२ | | |
| निकाल तारीख | : | २०.०७.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | म. | दि. |
| | | ०३ | ०९ | ०८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र.२ चिखली, जिल्हा बुलडाणा**

**पीठासीन अधिकारी श्रीमती एस एच उके न्या.दं.प्र.वर्ग**

**निकाल तारीख २०.०७.२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र. ३४९/२०२२** **निशाणी क्र. ७६**

**गुन्हा क्रमांक १४०/२०२२,**

**भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६**

**सह कलम १४९ अन्वये**

**पोलिस स्टेशन, अंढेरा**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष / फिर्यादी** | : | | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, अंढेरा, ता. चिखली, जि. बुलडाणा |
| **सरकार पक्षातर्फे** | : | | श्रीमती आर. एस. जाधव (सहा.सरकारी वकील) |
| **आरोपी** | : | १. | सरताज खान मुमताज खान<br>वय ४४ वर्षे, व्यवसाय – घरकाम, |

| | | | |
|---|---|---|---|
| | : | २. | शेख जुबेर उर्फ शेख मोईन मुबारख,<br>वय ३६ वर्षे, व्यवसाय – मजुरी |
| | | ३. | समीर खान अनिस खान<br>वय २६ वर्षे, व्यवसाय – मजुरी |
| | | ४. | मुमताज खान आमीन खान,<br>वय ६६ वर्षे, व्यवसाय – मजुरी |
| | | ५. | जावेद खान मुमताज खान<br>वय २९ वर्षे, व्यवसाय – मजुरी |
| | | ६. | मुजाहिद खान मुमताज खान<br>वय ३६ वर्षे, व्यवसाय – मजुरी |
| | | ७. | मिर्झा खान मुमताज खान<br>वय ४० वर्षे, व्यवसाय – मजुरी, |
| | | ८. | गौसीया बानो मिर्झा खान<br>वय ३४ वर्षे, व्यवसाय – घरकाम |
| | | ९. | आजीम बी मुमताज खान<br>वय ५४ वर्षे, व्यवसाय – घरकाम |
| | : | | सर्व रा. असोला<br>ता.चिखली, जि. बुलडाणा |
| **आरोपीतर्फे वकील -** | : | | (श्री. एस. एम. शेख वकील) |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०१.०५.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०२.०५.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १२.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चीत तारीख | ०३.१०.२०२३ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | २७.०३.२०२६ |
| प्रकरण न्यायानिर्णया करीता ठेवले ती तारीख | २०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २०.०७.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | .... |

<u>आरोपीचा तपशिल</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडयाची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी. आर. पी प्रमाणे शिक्षेमधून सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सरताज खान मुमताज खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ | निर्दोष | ... | ... |
| २. | शेख जुबेर उर्फ शेख मोईन मुबारख | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | ... |
| ३. | समीर खान अनिस खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | ... |
| ४. | मुमताज खान आमीन खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | जावेद खान मुमताज खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | अन्वये | निर्दोष | ... | --- |
| ६. | मुजाहिद खान मुमताज खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | --- |
| ७. | मिर्झा खान मुमताज खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | --- |
| ८. | गौसीया बानो मिर्झा खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | --- |
| ९. | आजीम बी मुमताज खान | ०४.०५.२०२२ | ०४.०५.२०२२ | | निर्दोष | ... | --- |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : २०.०७.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये दोषारोप ठेवून चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,**

दिनांक ०१.०५.२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजताचे सुमारास फिर्यादी शबाना परवीन शेख आलमगीर, तिची सासु, सासरे, दिर व दिराची पत्नी घरी असतांना, आरोपी क्र. १ ते ६ तेथे लोखंडी गज व काठ्या घेवून आले व फिर्यादीचे दिर शेख इरशाद शेख दस्तगीर यांच्या डाव्या हातावर, आरोपी क्र. २ याने लोखंडी गज मारुन जखमी केले व आरोपी क्र. ५ याने पाठीवर काठीने मारहाण केली. फिर्यादीचा दिर शेख शब्बीर शेख दस्तगीर याचे डोक्यावर आरोपी

क्र. १ व ७ यांनी लोखंडी गजाने मारहाण करुन जखमी केले तसेच आरोपी क्र. ३ यांनी काठीने पाठीवर मारहाण केली. सदर वाद चालु असतांना फिर्यादी मध्ये गेली असता आरोपी क्र. ६ ने ओरबडले तसेच आरोपी क्र. ८ व ९ यांनी लोटपाट केली. सदर भांडणामध्ये फिर्यादीची पोथ तुटून पडली. आरोपी क्र. ४ यांनी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर, दिनांक ०२.०५.२०२२ रोजी पोलीस स्टेशन, अंढेरा येथे फिर्याद दिली.

०३. प्रथम खबर देणार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, अंढेरा येथे आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा क्रमांक १४०/२०२२ नोंदविण्यात आला. घटनेचा पुढील तपास अच्युतराव सिरसाट यांचेकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान तपासी अंमलदाराने पंचासमक्ष घटनास्थळावर जावून घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपींना अटक केली व तपासाअंती आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ नुसार या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीं विरुद्ध भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये निशाणी क्र. ४२ वर दोषारोप नोंदवून त्यातील मजकूर आरोपींना समजावून सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली.

०५. अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन गुन्हादर्शक परिस्थिती न्यायालयासमोर न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती आर. एस. जाधव व आरोपीचे वकील श्री. एस. एम. शेख यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अभिलेखावरील पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचारार्थ असून त्यावरील निष्कर्ष व कारणे खालील प्रमाणे देण्यात आली.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, दिनांक ०१.०५.२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता, मौजे असोला, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमा करुन ते त्या जमावाचा घटक होते व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १४३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा केला व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १४७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीवर दुखापत, हमला करण्याची पूर्वतयारी करुन नंतर गृहअतिक्रमण केले आणि त्यायोगे भारतीय दंड | |

| | | |
|---|---|---|
| | संहिता, १८६० च्या कलम ४५२ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी फिर्यादीचे दिर यांना लोखंडी गजाने मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ५. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ६. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना सामाईक उद्देशाने पूर्तीकरीता शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले व प्रक्षोभामुळे त्यांचेडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही गुन्हा व्हावा अशा उद्देशाने अपमान केला व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०४ सह | |

| | | |
|---|---|---|
| | कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ७. | अभियोगपक्षाने असे सिद्ध केले काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी सामाईक उद्देशाने पूर्तीकरीता फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली आणि भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०६ सहकलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **.... नकारार्थी** |
| ८. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## : कारणमिमांसा :

०८. अभियोग पक्षातर्फे खालीलप्रमाणे साक्षीदार तपासण्यात आले.

| साक्षीदार | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | शबाना परवीन शेख अलमगीर | फिर्यादी |
| सा.क्र.२ | शेख शब्बीर शेख दस्तगीर | जखमी साक्षीदार |
| सा.क्र.३ | शेख इरशाद शेख दस्तगीर | जखमी साक्षीदार |

०९. आरोपी व फिर्यादी यांनी सदरचे प्रकरण आपसात करण्याकरीता परवानगी मिळण्याकरीता अर्ज नि.क. ६१ दाखल केला. सदरचा गुन्हा तडजोड पात्र नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला. फिर्यादीने त्याला सदरचे प्रकरण पुढे चालविणे नाही करीता पुरसीस नि.क्र. ६७ वर दाखल केली आहे. आरोपीच्या वतीने घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. ६८, वैद्यकीय रेफरल स्लीप निशाणी क्र. ६९ ते ७१, वैद्यकीय प्रमाणपत्र निशाणी क्र. ७२ व जप्ती पंचनामा निशाणी क्र. ७३ ते ७५ मान्य केले आहेत.

## मुद्दा क्र. १ ते ८ करीता

१०. सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे गुणग्रहण एकत्रीतरित्या करण्यात येत आहे. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी सा.क्र.१ शबाना परवीन शेख अलमगीर हिने असे कथन केले की, घटना कधी घडली हे तिला माहित नाही. अभिलेखावर दाखल रिपोर्ट व प्रथम खबर अहवालावर तिची सही आहे परंतु, त्यातील मजकूर तिला माहीत नसल्याचे ती सांगत आहे. आरोपींनी तिला व तिच्या परिवाराला लोखंडी गजाने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सदर साक्षीदार सांगत आहे.

११. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले सा.क्र.२ शेख शब्बीर शेख दस्तगीर याने असे कथन केले की, फिर्यादी ही त्याची भावजय आहे. घटना ही कधी घडली हे त्याला माहिती नाही. घटनेच्या वेळेस तो व त्याचे कुटूंब घरी हजर असतांना आरोपींनी त्याला व त्याच्या परिवाराला लोखंडी गजाने मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सदर साक्षीदार सांगत आहे.

१२. सा.क्र.३ शेख इरशाद शेख दस्तगीर याने असे कथन केले की, फिर्यादी ही त्याची भावजय आहे. घटना ही कधी घडली हे त्याला माहीत नाही. घटनेच्या वेळेस तो व त्याचे कुटूंब घरी हजर असतांना आरोपींनी त्याला व त्याच्या परिवाराला लोखंडी गजाने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सदर साक्षीदार सांगत आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी हे महत्वाचे साक्षीदार आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटना दि. ०१.०५.२०२२ रोजी घडल्याचे कथन केले

आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार कथीत घटनेच्या वेळेस आरोपींनी फिर्यादीच्या घरात घुसून तिला व तिच्या कुटूंबियांना लोखंडी रॉडने तसेच काठीने मारहाण केली, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. परंतु, फिर्यादी व जखमी साक्षीदार यांनी अभियोग पक्षाला पूरक अशी साक्ष दिलेली नाही. तसेच त्यांना विचारण्यात आलेल्या उत्तर सूचक प्रश्नावरुन अभियोग पक्षाला पूरक असे काहीच अभिलेखावर आले नाही. फिर्यादीने अभियोग पक्षाला समर्थन केले नाही ही बाब महत्वपूर्ण ठरते व एकुणच घटनेबाबत साशंकता निर्माण होते.

१४. फिर्यादीच्या उलट तपासावरुन तिचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे दिसून येते. फिर्यादी व आरोपी यांचेतील संबंध व वादाची तडजोड विचारात घेता फिर्यादीच्या कथनांना दुजोरा मिळत नाही. व आरोपी विरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध होत नाही. आरोपी व फिर्यादी यांनी भविष्यात चांगले संबंध ठेवण्यासाठी तडजोड केल्याचे नमूद केले आहे. सबब फिर्यादी व अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी अभियोग पक्षास समर्थन केले नाही या कारणास्तव कार्यवाही करणे उचीत होणार नाही. अभियोग पक्ष आरोपीं विरुद्ध दोषारोप सिद्ध करु शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ७ चे उत्तर "नकारार्थी " देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ८ करीता</u>**

१५. मुद्दा क्र. १ ते ७ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपींची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचे कडून फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन बंधपत्र घेण्यात येत आहे. करिता मुद्दा क्र. ८ चे उत्तर मी खालील आदेशाप्रमाणे नोंदवित आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ सरताज खान मुमताज खान, क्र. २ शेख जुबेर उर्फ शेख मोईन मुबारख, क्र. ३ समीर खान अनिस खान, क्र. ४ मुमताज खान आमीन खान, क्र. ५ जावेद खान मुमताज खान, क्र. ६ मुजाहिद खान मुमताज खान, क्र. ७ मिर्झा खान मुमताज खान, आरोपी क्र. ८ गौसीया बानो मिर्झा खान व आरोपी क्र. ९ आजीम बी मुमताज खान सर्व रा. आसोला, ता. चिखली, जि. बुलडाणा, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. अपिल कालावधीनंतर ; जप्त मुद्देमाल – दोन काठ्या व दोन गजाचे तुकडे हे मुल्यहीन असल्याने त्याचा नाश करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे बंधपत्र द्यावे.

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.07.20 16:59:58 +0530

स्थळ – चिखली
दिनांक :२०.०७.२०२६

( श्रीमती एस.एच. उके )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२ चिखली.

## भाग "क"

## अभियोजन / आरोपीतर्फे / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | शबाना परवीन शेख अलमगीर | फिर्यादी |
| सा.क्र.२ | शेख शब्बीर शेख दस्तगीर | जखमी साक्षीदार |
| सा.क्र.३ | शेख इरशाद शेख दस्तगीर | जखमी साक्षीदार |

### ब. आरोपी तर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

## अभियोजन / आरोपीतर्फे / न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोजन पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | **कागदपत्रांचे वर्णन** |
|---|---|
| ६३ | रिपोर्टवरील सही |
| ६४ | प्रथम खबर अहवालावरील सही |

| | |
|---|---|
| ६८ | घटनास्थळ पंचनामा (आरोपींनी मान्य केलेले) |
| ६९ ते ७१ | वैद्यकीय रेफरल स्लीप (आरोपींनी मान्य केलेले) |
| ७२ | वैद्यकीय प्रमाणपत्र (आरोपींनी मान्य केलेले) |
| ७३ ते ७५ | जप्ती पंचनामा (आरोपींनी मान्य केलेले) |

## ब. आरोपी तर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | –निरंक– | |

## ड. मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ओ.पी. क्र. ०६/२६ | दोन काठ्या |
| २ | ओ.पी. क्र. ०६/२६ | दोन गज |

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.07.20 16:59:50 +0530

स्थळ – चिखली
दिनांक :२०.०७.२०२६

( श्रीमती एस.एच. उके )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२ चिखली.